# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३०    फॅक्स :०२०-२६३३ ३५९६


जा. क्र. बार्टी/पुणे/BANRF अधिछात्रवृत्ती/२०२२-२३/३५    दिनांक ०३/१/२०२३

## BANRF-२०२२ घोषणापत्र

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था "बार्टी" मार्फत पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधानासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती BANRF-२०२२ करिता अर्ज मागविणे बाबत. बार्टी, पुणे मार्फत, महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीमधील पीएच.डी करू इच्छीणाऱ्या तसेच दिनांक ०१ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीमध्ये पीएच.डी साठी कायम नोंदणी (Confirmed Registration) असणाऱ्या तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयामध्ये नामांकित विद्यापीठामधून पीएच.डी करू इच्छीणाऱ्या परंतु नोंदणी न झालेल्या संशोधक विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर BANRF-२०२२ अंतर्गत एकूण २०० विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देण्यात येणार आहे. संशोधक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठी लिंक ➡ NOTICE BOARD BANRF- 2022 या बार्टीच्या अधिकृत संकेतस्थळावर https://fellowship.bartieducare.in/student/register क्लिक करून अर्ज भरावा. सदर लिंक दिनांक २ जानेवारी २०२३ ते ३१ जानेवारी २०२३ पर्यत सुरु राहील.

BANRF-२०२२ अर्जाची प्रिंट आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह पोस्टाने किंवा प्रत्यक्ष बार्टी मुख्यालय, पुणे येथे दिनांक १० फेब्रुवारी २०२३ पर्यत प्राप्त होणे अनिवार्य आहे. ज्या विद्यार्थ्यांची अर्जाची प्रत बार्टी कार्यालयास प्राप्त होणार नाही त्यांचा अर्ज पुढील प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

**ऑनलाईन भरण्याबाबत सूचना:**

१. ऑनलाईन अर्ज भरताना सर्व माहिती काळजीपूर्वक भरण्यात यावी कोणत्याही प्रकारची खोटी माहिती देण्यात येऊ नये, जर मूळ कागदपत्र पडताळणी मध्ये जोडलेल्या कागदपत्रांमध्ये तफावत आढळल्यास सदर विद्यार्थी BANRF-२०२२ च्या प्रक्रियेतून तसेच पुढील सर्व अधिछात्रवृत्ती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल नंतर कोणत्याही प्रकारची सबब विचारात घेतली जाणार नाही.

२. पीएच.डी नोंदणी तपशील भरताना ऑनलाईन अर्जासोबत जोडण्यात आलेल्या विषय सूची/यादी मदतीने योग्य शाखा (Stream) निवडावी.

३. विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयामध्ये नामांकित विद्यापीठामध्ये जसे कि

   a. CBMR- Centre of Bio-medical Research – ACSIR Ph.D program
   b. CSIR- Central Drug Research Institute, Lucknow (CSIR-CDRI-SCSIR Ph.D Program)
   c. CSIR- Indian Institute of Petroleum, Dehradun, Uttrakhand
   d. National Centre for Cell Science, Pune

e. National Agri-Food Biotechnology Institute (NABI)

f. CSIR National Chemical Laboratory

g. DBT- National Institute of Himalayan Bio-resource Technology, Palampur (Himachal Pradesh)

h. Others (If Yes Specify)

वरील विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयामध्ये नामांकित विद्यापीठामध्ये पीएच.डी करू इच्छीणाऱ्या परंतु कायम नोंदणी नसणाऱ्या (Not Registered Candidate) या पर्यायामधून अर्ज भरावा.

४) खालील नमूद कागदपत्रांची PDF करून सदर कागदपत्र स्व-साक्षांकित करून ऑनलाईन अर्जासोबत upload करावे.

१. SSC Certificate

२. HSC Certificate

३. Graduation Certificate

४. Post-Graduation Certificate

५. Ph.D Confirmation Registration Details

६. Caste Certificate

७. Caste Validity Certificate

८. Addhar Card

९. Photo (JPG) file (५० KB, JPG file)

१०. Digital Signature (५० KB, JPG file)

सूचना:

१. ज्या विद्यार्थ्यांनी या पूर्वी २०२१ च्या लिंक मधून अर्ज भरला असेल अशा विद्यार्थ्यांनी BANRF-२०२२ च्या नवीन लिंकमधून नवीन युजर आयडी आणि पासवर्ड बनवून नव्याने फॉर्म भरावा.

२. अर्ज करणाऱ्या सर्व संशोधक विद्यार्थ्यांनी BNARF-२०२२ साठी प्रसिद्ध करण्यात आलेले मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद सर्व तपशील वाचणे आवश्यक आहे.

३. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद सर्व आवश्यक formats BANRF-२०२२ अवार्ड लेटर प्राप्त झाल्यानंतर संशोधक विद्यार्थ्यांना बार्टी कार्यालयास सादर करायचे आहे.

मा. महासंचालक बार्टी पुणे यांचे मान्यतेने.

(विभाग प्रमुख)
योजना विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था, पुणे